# प्रकरण ५ कायदेमंडळ

NOTES

- प्रस्तावना
- कायदेमंडळाची रचना
- लोकसभेची रचना
- लोकसभेचे सभापती
- लोकसभेचे अधिकार व कार्य
- राज्यसभा
- राज्यसभेचे अध्यक्ष
- राज्यसभेचे अधिकार व कार्य
- कायदेमंडळाची/संसदेची अधिकार व कामे
- घटक राज्य विधिमंडळ,
- सभापती:
- विधानसभेचे अधिकार व कार्ये ५.१३ विधानपरिषद
- विधानसभेचे अधिकार व कार्य
- विधानपरिषद अधिकार व कार्य
- विधिमंडळाचे अधिकार व कार्य

या प्रकरणात आपल्याला पुढील गोष्टींचा अभ्यास करता येईल. कायदेमंडळ म्हणजे काय किंवा कायदेमंडळ कशाला म्हणतात. लोकसभा व राज्यसभा या दोन सभागृहांची आवश्यकता. लोकसभा व राज्यसभेचे अधिकार व कार्य स्पष्ट करता येईल. कायदेमंडळाचे अधिकार व कार्य स्पष्ट करता येईल. घटक राज्याचे कायदेमंडळ कशाला म्हणतात. विधानसभा व विधानपरिषदेची रचना स्पष्ट करता येईल. घटक राज्य विधिमंडळाचे अधिकार व कार्य स्पष्ट करता येईल.

# प्रस्तावना

लोकशाहीत कायदेमंडळ ही सर्वोच्च संस्था असते. भारताच्या कायदेमंडळाला 'संसद' असे म्हणतात. भारतात द्विगृही कायदेमंडळ आहे. लोकसभा, राज्यसभा व राष्ट्रपती यांनी / मिळून भारताचे केंद्रीय कायदेमंडळ बनते तर विधानसभा, विधानपरिषद व राज्यपाल यांनी मिळून घटक राज्याचे कायदेमंडळ बनते. राज्यसभा व लोकसभा ही संसदेची दोन प्रमुख सभागृहे आहेत. राज्यसभा हे घटक राज्याचे प्रतिनिधित्व करणारे वरिष्ठ सभागृह आहे, तर लोकसभा हे जनतेचे प्रतिनिधित्व करणारे कनिष्ठ सभागृह आहे. भारतात केंद्राप्रमाणे मोजक्याच घटक राज्यांत द्विगृही कायदेमंडळ आहे. विधानसभा हे जनतेचे प्रतिनिधित्व करणारे कनिष्ठ सभागृह असून विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह आहे.

## केंद्रीय कायदेमंडळ रचना

देशातील सर्व प्रमुख प्रश्नांची चर्चा करण्याचे कायदे करणारी व जनतेला जबाबदार असणारी सर्वोच्च संस्था म्हणजे कायदेमंडळ होय. लोकसभा, राज्यसभा व राष्ट्रपती यांनी मिळून भारताचे केंद्रीय कायदेमंडळ बनते.

## लोकसभा

लोकसभा हे संसदेचे कनिष्ठ सभागृह असून जनतेने प्रत्यक्ष निवडलेले प्रतिनिधी या सभागृहात असतात. संपूर्ण देशाचे लोकसंख्येच्या आधारावर मतदारसंघ तयार करून प्रत्येक मतदारसंघातून एक प्रतिनिधी निवडला जातो.

## लोकसभेची रचना

लोकसभा या सभागृहाची सदस्यसंख्या ५४५ एवढी असते. पैकी ५३० सदस्य घटक राज्यांच्या मतदारसंघातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडले जातात. केंद्रशासित प्रदेशामधून १३ सदस्य निवडले जातात. अँग्लो इंडियन समाजाचे दोन प्रतिनिधी लोकसभेवर नियुक्त करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे.

लोकसभेतील सदस्यांची निवड ही गुप्त आणि प्रौढ मतदान पद्धतीने केली जाते. वय वर्ष १८ पूर्ण करणाऱ्या भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला जातो. साध्या बहुमताने लोकसभेची निवडणूक होते. ज्या उमेदवाराला सर्वाधिक मते मिळतील तो उमेदवार विजयी म्हणून घोषित केला जातो.

## सदस्यत्वाच्या पात्रता

कलम ८४ मध्ये लोकसभा सदस्यत्वाची पात्रता दिली आहे. पात्रतेच्या अटी पुढीलप्रमाणे:

१. ती व्यक्ती भारताची नागरिक असावी.
२. वय वर्ष २५ पूर्ण असावे.

३. संसदेने वेळोवेळी निश्चित केलेल्या अटींची पूर्तता केलेली असावी. अपात्रतेच्या अटी:

**संसदेने कायदा करून अपात्रतेच्या अटीदेखील निश्चित केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे:**

१. निवडणूक लढविणारी व्यक्ती केंद्र सरकार व राज्यसरकारमध्ये नोकरीला असता कामा नये.

२. ती व्यक्ती मनोविकलांग असता कामा नये.

३. दिवाळखोर असता कामा नये.

४. परदेशी नागरिक असता कामा नये.

५. संसदेने कायदा करून अपात्र ठरविले असेल तर.

## लोकसभेचा कार्यकाळ

लोकसभेचा कार्यकाळ हा पाच वर्षांचा असतो. पाच वर्षांनंतर नव्याने निवडणुका घेतल्या जातात आणि नवी लोकसभा अस्तित्वात येते. मुदतपूर्वदेखील लोकसभा बरखास्त होऊ शकते. अपवादात्मक परिस्थितीत लोकसभेची मुदत वाढविता येते. आणीबाणीच्या वेळी लोकसभेची मुदत वाढविता येते. आणीबाणी संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत निवडणुका घ्याव्या लागतात.

## गणसंख्या

लोकसभेचे कामकाज चालविण्यासाठी आवश्यक असणारी सदस्य संख्या म्हणजे गणसंख्या होय. लोकसभेचे कामकाज चालविण्यासाठी एकूण सदस्य संख्येच्या दहा टक्के सदस्य संख्या आवश्यक असते. गणसंख्या पूर्ण नसल्यास सभापती कामकाज स्थगित करू शकतात.

## लोकसभेचे सभापती

लोकसभेच्या बैठकींचे कामकाज चालविण्यासाठी सभापतींची आवश्यकता असते. लोकसभेच्या पहिल्या बैठकीच्या वेळी निवडून आलेले सदस्य आपल्यामधूनच एकाची सभापती म्हणून निवड करतात. सभापती हे सभागृहाची मुदत असेपर्यंत पदावर राहतात. ठराव पास

सभापती स्वमर्जीने आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात. अविश्वासाचा करून त्यांना पदावरून दूर करता येते.

## सभापतींचे अधिकार व कार्य

सभापती पद हे अत्यंत सन्मानाचे पद असून त्यांना महत्त्वाचे अधिकार व कार्ये करावी लागतात.

१. सभागृहाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणे.

२. सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे पार पाडणे आणि कामकाजाच्या नियमांचा अर्थ स्पष्ट करणे.

३. सभागृहात शांतता व शिस्त टिकवून ठेवणे.

४. एखादा प्रश्न स्वीकारणे अथवा नाकारणे, स्थगन प्रस्ताव मान्य करणे अथवा अमान्य करणे.

५. निर्णायक मत देऊन पेच प्रसंग सोडविणे.

६. संसदेचे दप्तर सांभाळणे, गैरवर्तन करणाऱ्या सदस्याला समज देणे.

७. कामकाज चालविण्यासाठी गणपूर्ती आहे किंवा नाही हे तपासणे.

८. संयुक्त बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणे.

९. एखादे विधेयक हे अर्थविधेयक आहे की सामान्य विधेयक याबाबत निर्णय घेणे.

१०. सर्व सदस्यांना भाषण करण्याची संधी देणे, सदस्यांच्या विशेषाधिकारांचे रक्षण करणे.

## लोकसभेचे उपसभापती

सामान्य विधेयक याबाबत निर्णय घेणे.

लोकसभेच्या पहिल्या बैठकीच्या वेळी सभापतींबरोबर उपसभापतींचीही निवड केली जाते. सभापतींच्या गैरहजेरीत उपसभापती सभागृहाचे काम पाहतात. उपसभापतींना अविश्वासाचा ठराव पास करून पदावरून दूर करता येते.

## लोकसभेचे अधिकार व कार्ये

१. कार्यकारी मंडळावर प्रश्न विचारणे, स्थगन प्रस्ताव मांडणे, अविश्वास ठराव, लक्षवेधी सूचना या माध्यमातून नियंत्रण ठेवले जाते.

२. राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीत लोकसभेचे निवडून आलेले सदस्य सहभाग घेतात.

३. केंद्र सूची व सामायिक सूचीतील विषयांवर कायदे करणे.

४. सामान्य विधेयक, आर्थिक विधेयक व घटना दुरुस्ती विधेयक मांडणे व त्यास मंजुरी घेणे.

५. अंदाजपत्रकास मंजुरी देणे, समित्या व आयोगांची निर्मिती करणे.

## राज्यसभा

राज्यसभा हे संसदेचे वरिष्ठ आणि द्वितीय सभागृह आहे. कलम ७९ ते ९२ मध्ये राज्यसभेविषयी चर्चा केली आहे. राज्यसभा हे घटक राज्यांचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे. घटक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशाच्या विधानसभा सदस्यांकडून राज्यसभेचे प्रतिनिधी निवडले जातात.

## रचना

साहित्य, राज्यसभेत एकूण २५० सदस्य असतात. घटक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यांचे मिळून लोकसंख्येच्या प्रमाणात एकूण २३८ सदस्य निवडले जातात, तर कला, शास्त्र, क्रीडा, समाजकार्य या क्षेत्रांतून राष्ट्रपती उरलेल्या १२ सदस्यांची निवड करतात. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा व्हावा म्हणून राष्ट्रपती या सदस्यांची नियुक्ती राज्यसभेवर करतात. 1

## कार्यकाळ

राज्यसभा हे कायमस्वरूपी (स्थायी)सभागृह आहे. संपूर्ण सभागृह एकदम कधीच बरखास्त होत नाही. प्रत्येक सदस्याचा कार्यकाळ हा सहा वर्षांचा असतो. दर दोन वर्षांनी सभागृहातील एक तृतीयांश सदस्य निवृत्त होतात व तितकेच नव्याने निवडले जातात.

## सदस्यत्वाच्या पात्रता

१. भारतीय नागरिक असावा.

२. वयाची ३० वर्षे पूर्ण केलेली असावीत.

३. संसदेने कायदा करून निश्चित केलेल्या अटींची पूर्तता केलेली असावी.

## अपात्रता

१. निवडणूक लढविणारी व्यक्ती केंद्र सरकार व राज्यसरकारमध्ये नोकरीला असता कामा नये.

२. ती व्यक्ती मनोविकलांग असता कामा नये.

३. दिवाळखोर असता कामा नये.

४. परदेशी नागरिक असता कामा नये.

५. संसदेने कायदा करून अपात्र ठरविले असेल तर.

## सदस्यांची निवड

प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीने राज्यसभेचे सदस्य निवडले जातात. निवडणूक ही अप्रत्यक्ष असते. ज्या उमेदवाराला किमान मतसंख्येएवढी मते मिळतात तो उमेदवार निवडला जातो. मतदाराला मत देताना पसंती क्रमांक द्यावा लागतो.

## राज्यसभेचे अध्यक्ष

उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात; पण ते राज्यसभेचे सदस्य नसतात. मात्र उपराष्ट्रपती झालेली व्यक्ती राज्यसभेची अध्यक्ष बनते. लोकसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहांतील निवडून आलेल्या सदस्यांकडून उपराष्ट्रपतींची निवड केली जाते.

## कार्यकाळ

**अध्यक्षांचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो. तत्पूर्वी ते**

१. आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात.

२. मृत्यूमुळे त्यांचे पद रिकामे होऊ शकते.

३. त्यांना पदावरून दूर केले जाऊ शकते.

## अध्यक्षांची कामे व अधिकारः (उपराष्ट्रपतींची कामे व अधिकार)

१. सभागृहाचे अध्यक्षस्थान भूषविणे.

२. सभागृहाचे कामकाज चालविणे व नियंत्रित करणे

३. गणसंख्या पूर्ण आहे किंवा नाही हे पाहणे.

४. एखाद्या विधेयकावर समान मते पडल्यास निर्णायक मत देणे.

५. सभागृहात शिस्त राखणे, सभागृहाची प्रतिष्ठा राखणे.

७. याशिवाय विधेयक मांडणे, प्रश्न विचारणे, ठराव मांडणे यासाठी अध्यक्षांची संमती लागते.

## राज्यसभेचे अधिकार व कार्ये

१. कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवणे.

२. घटना दुरुस्ती व सामान्य विधेयकांना मंजुरी देणे.

३. राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीत मतदान करणे.

४. उपराष्ट्रपती बडतर्फ करण्यासाठी महाभियोग चालविणे.

## कायदेमंडळाची/संसदेची अधिकार व कामे

कायदेमंडळ ही देशातील सर्वोच्च संस्था असल्याने देशापुढील सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा करण्याचे व उत्तर शोधण्याचे केंद्र मानले जाते. कायदेमंडळ सर्व प्रकारच्या ध्येयधोरणांची चर्चा करते. संसदीय राजकीय प्रक्रियेचे ते केंद्र आहे. संसद हे प्रातिनिधिक लोकशाहीचे वास्तविक रूप आहे.
सर्वसाधारणपणे संसदेला पुढील स्वरूपाची कार्ये करावी लागतात.

## १. कायदे करणे

कायदेमंडळाचे मूलभूत काम म्हणजे कायदे करणे. केंद्र सूची व सामायिक सूचीतील विषयांवर कायदे करण्याचे काम कायदेमंडळ करते. संसद ही कायदा बनविणारी मुख्य संस्था आहे.

## २.कार्यकारी अधिकार

कायदेमंडळ कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवत असते. प्रश्नोत्तराचा तास, स्थगन प्रस्ताव, तहकुबी सूचना, लक्षवेधी सूचना, कपात सूचना, अविश्वासाचा ठराव अशा मार्गांनी कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवले जाते. संसदीय शासनप्रणालीत सामूहिक जबाबदारीचे तत्त्व महत्त्वाचे मानले जाते. मंत्रीमंडळ हे लोकसभेला जबाबदार असते. मंत्रिमंडळावर अविश्वासाचा ठराव मंजूर झाल्यास मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

## ३. आर्थिक अधिकार

सरकारच्या जमाखर्चाच्या हिशोबाला कायदेमंडळाची संमती आवश्यक असते. कायदेमंडळाच्या संमतीशिवाय सरकार पैसा उभा करू शकत नाही किंवा खर्चही करू शकत नाही. शासनाच्या सर्व आर्थिक व्यवहारांना कायदेमंडळाची मंजुरी घ्यावी लागते. दरवर्षीचे अंदाजपत्रक कायदेमंडळापुढे मांडले जाते. नवीन कर जरी बसवायचा असेल तरीही त्यास कायदेमंडळाची संमती आवश्यक असते. अर्थविधेयक हे प्रथम लोकसभेत मांडावे लागते.

## ४. घटना दुरुस्तीचा अधिकार

/ एखादा कायदा रद्दबातल करणे, काढून टाकणे, घटना दुरुस्ती करणे किंवा कलमांमध्ये अधिकची भर टाकणे यांबाबतीतील सर्व अधिकार कायदेमंडळाकडेच आहेत. साध्या बहुमताने, विशेष बहुमताने,आणि विशेष बहुमत आणि निम्म्यापेक्षा अधिक घटक राज्यांची मान्यता या तीन प्रकारे घटना दुरुस्ती करण्याचा अधिकार कायदेमंडळाला आहे.

**निवडणूकविषयक अधिकार** : लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांतील वडून आलेले सदस्य हे राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीत मतदान करतात.

## 4. पदाधिकाऱ्यांना दूर करण्याचा अधिकार

राष्ट्रपती व उपराष्ट्रपती, सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, निवडणूक प्रमुख अशा पदाधिकाऱ्यांना पदावरून दूर करण्याचा अधिकार कायदेमंडळाला आहे,

## ६. वटहुकुमांना मान्यता

आयोगाचे करण्याची गरज

संसदेचे अधिवेशन चालू नसेल अशा वेळी एखाद्या विषयावर कायदा निर्माण झाली, तर राष्ट्रपती वटहुकूम काढू शकतात. वटहुकूम हा तात्पुरता असतो. कायदेमंडळाने जर वटहुकुमाला मान्यता दिली, तर त्याचे कायद्यात रूपांतर होते, अन्यथा तो रद्द होतो. वटहुकुमाला सहा महिन्यांच्या आत कायदेमंडळाची मान्यता घ्यावी लागते.

संसदेचे इतरही काही महत्त्वाचे अधिकार असतात. ते म्हणजे येत नाही.

१. सभागृहातील कामकाज प्रसिद्ध करणे. गुप्त बैठकीचे वृत्त प्रसिद्ध करता

२. संसद सदस्याने विशेष अधिकाराचा भंग केल्यास किंवा सभागृहाचा अपमान केल्यास त्यास शिक्षा करण्याचा अधिकार सभागृहास असतो.

# घटक राज्य विधिमंडळः

**घटक राज्याच्या कायदेमंडळाला विधिमंडळ म्हणतात.**

## रचना

घटक राज्य विधिमंडळाची रचना अधिकार वभूमिकाहीदेखील केंद्रीय कायदेमंडळाप्रमाणे असते. केंदीय कायदेमंडळाची दोन सभागृहे आहेत. मात्र भारतात मोजक्याच घटक राज्यांत द्विगृही विधिमंडळ आहेत. उत्तरप्रदेश, बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश या राज्यात द्विगृही विधिमंडळे आहेत. राज्यपाल, विधानसभा व विधानपरिषद यांनी मिळून घटक राज्याचे विधिमंडळ बनते. /

# विधान सभा

विधानसभा हे घटक राज्याचे प्रथम व कनिष्ठ सभागृह आहे. जनतेने प्रत्यक्ष निवडलेले प्रतिनिधी या सभागृहात असतात. घटक राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात विधानसभेची सदस्यसंख्या असते. त्यामुळे प्रत्येक घटक राज्याची विधानसभा सदस्य संख्या वेगवेगळी असते. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, प.बंगाल, राजस्थान या राज्यांची विधानसभा सदस्य संख्या फार मोठी असून ईशान्येकडील राज्ये, गोवा, सिक्किम या राज्यांची सदस्य संख्या फारच कमी आहे. विधानसभा सदस्य संख्या जास्तीत जास्त ५०० पर्यंत असू शकते. ६० पेक्षा कमी असू नये; पण काही राज्यांची सदस्य संख्या ६० पेक्षा कमी आहे. अनुसूचित जाती व जमातींस काही जागा राखीव असतात.

## सदस्य पात्रता

१. ती व्यक्ती भारताची नागरिक असावी.

२. वय वर्ष २५ पूर्ण असावे

३. संसदेने वेळोवेजो निश्चित केलेल्या अटींची पूर्तता केलेली असावी.

## अपात्रतेच्या अटी

संसदेने कायदा करून अपात्रतेच्या अटोदेखील निश्चित केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे

१. निवडणूक लडविणारी व्यक्ती केंद्र सरकार व राज्यसरकारमध्ये नोकरीला असता कामा नये.

२. तो व्यक्तो मनोविकलांग असता कामा नये.

३. दिवाळखोर असता कामा नये,

४. परदेशी नागरिक असता कामा नये.

५. संसदेने कायदा करून अपात्र ठरविले असेल तर,

## कार्यकाळ

विधानसभेचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो. मुदतपूर्वदेखील निवडणूक होऊ शकते. आणीबाणीच्या काळात सहा महिने विधान सभेची मुदत वाढविता येते. अविश्वासाचा ठराव, राष्ट्रीय आणीबाणी घटक राज्याची आणीबाणी अशा काही कारणांनी विधानसभा मुदती अगोदर बरखास्त होऊ शकते.

## सभापती

विधानसभेच्या बैठकींचे कामकाज चालविण्यासाठी सभापतींची आवश्यकता असते. विधानसभेच्या पहिल्या बैठकीच्या वेळी निवडून आलेले सदस्य आपल्यामधूनच एकाची सभापती म्हणून निवड करतात. सभापती हे सभागृहाची मुदत असेपर्यंत पदावर राहतात. सभापती स्वमर्जीने आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात. अविश्वासाचा ठराव पास करून त्यांना पदावरून दूर करता येते.

### सभापतींचे अधिकार व कार्य:

**सभापती पद हे अत्यंत सन्मानाचे पद असून त्यांना महत्त्वाचे अधिकार व कार्ये करावी लागतात.**

१. सभागृहाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणे.

२. सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे पार पाडणे आणि कामकाजाच्या नियमांचा अर्थ स्पष्ट करणे.

३. सभागृहात शांतता व शिस्त टिकवून ठेवणे.

४. एखादा प्रश्न स्वीकारणे अथवा नाकारणे, स्थगन प्रस्ताव मान्य करणे अथवा अमान्य करणे.

५. निर्णायक मत देऊन पेच प्रसंग सोडविणे.

६.विधानसभेचे दप्तर सांभाळणे, गैरवर्तन करणाऱ्या सदस्याला समज देणे.

७. कामकाज चालविण्यासाठी गणपूर्ती आहे किंवा नाही हे तपासणे.

८. संयुक्त बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणे

९. एखादे विधेयक हे अर्थविधेयक आहे की सामान्य विधेयक याबाबत निर्णय घेणे.

१०. सर्व सदस्यांना भाषण करण्याची संधी देणे, सदस्यांच्या विशेषाधिकारांचे रक्षण करणे.

## विधानसभेचे उपसभापती

विधानसभेच्या पहिल्या बैठकीच्या वेळी सभापतींबरोबर उपसभापतींचीही निवड केली जाते. सभापतींच्या गैरहजेरीत उपसभापती सभागृहाचे काम पाहतात. उपसभापतींना अविश्वासाचा ठराव पास करून पदावरून दूर करता येते.

## विधानसभेचे अधिकार व कार्ये

१. राज्य सूची व सामायिक सूचीतील विषयांसंबंधी कायदे करण्याचा अधिकार विधानसभेला आहे.

२. आर्थिक अधिकाराबाबत अर्थविधेयक प्रथम विधानसभेत मांडावे लागते. विधानसभेच्या संमतीशिवाय शासनाला कर आकारता येत नाही व खर्चही करता येत नाही. दरवर्षीच्या अंदाजपत्रकाला विधानसभेची मान्यता घ्यावीच लागते.

३. विधानसभा मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवते, तर मंत्रिमंडळ विधानसभेला जबाबदार असते. मंत्रिमंडळावर विधानसभेत अविश्वास ठराव पास झाल्यास मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

४. दुसऱ्या सभागृहाची निर्मिती किंवा बरखास्ती ही विधानसभेच्या संमतीवरच असते.

५. राष्ट्रपती आणि राज्यसभा सदस्य यांच्या निवडणुकीसाठी विधानसभा सदस्य मतदान करतात.

६. राज्यपालांनी काढलेल्या वटहुकुमांना विधानसभेची मान्यता घ्यावीच लागते.

## विधानपरिषद

घटक राज्य विधिमंडळाचे विधानपरिषद हे द्वितीय व वरिष्ठ सभागृह आहे. सध्या सहा राज्यांत विधानपरिषद आहे. उत्तरप्रदेश, बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश व तामिळनाडू या सहा राज्यांत विधानपरिषद आहे. विधानसभेच्या तुलनेत विधानपरिषद फारच कमी आहे.

## सदस्यसंख्या

विधानपरिषदेची सदस्य संख्या विधानसभेच्या सदस्य संख्येच्या प्रमाणात असल्याने ती वेगवेगळी असू शकते. सदस्य संख्येबाबत राज्यघटनेत तरतूद नाही; पण विधानसभेच्या सदस्य संख्येच्या एक तृतीयांशपेक्षा जास्त असू नये. तसेच ४० पेक्षा कमी असता कामा नये. महाराष्ट्र विधानपरिषदेची सदस्य संख्या ७८ एवढी आहे.

## कार्यकाळ

विधानपरिषद हे स्थायी सभागृह आहे. ते कधीही बरखास्त होत नाही. दर दोन वर्षांनी एक तृतीयांश सदस्य निवृत्त होतात व तितकेच नव्याने निवडले जातात. प्रत्येक सदस्याची मुदत सहा वर्षांची असते.

## सदस्यांची निवड

१. १/३ सदस्य विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत निवडले जतात.

२. शिक्षक व पदवीधर मतदारसंघातून १/१२ सदस्य निवडले जातात.

३. १/६ सदस्य राज्यपाल नियुक्त असतात.

सदस्यांची निवड ही गुप्त व क्रमदेय एकमतदान पद्धतीने होते.

## सभापती व उपसभापती

विधानपरिषदेचे सदस्य आपल्यातूनच एकाची सभापती व उपसभापती म्हणून निवड करतात. सभापतीस अध्यक्ष व उपसभापतीस उपाध्यक्ष म्हटले जाते.
सभापतीस व उपसभापती यांचा कार्यकाळ, त्यांना पदावरून हटविण्याच्या तरतुदी या लोकसभेच्या सभापती व उपसभापतीप्रमाणेच असतात. विधानपरिषदेच्या सदस्यांनादेखील वैयक्तिक व सामूहिक विशेषाधिकार असतात.

## सभापतींची कामे

१. सभागृहाचे अध्यक्षस्थान भूषविणे.

२. सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे चालविणे व नियमन करणे,

३. ठरावांना व प्रस्तावांना पूर्वसंमती देणे,

४. सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी गणसंख्यापूर्ती आहे किंवा नाही हे पाहते. ५. सभागृहात गोंधळ झाल्यास कामकाज तहकूब करणे.

६. एखाद्या विधेयकावर समसमान मते पडल्यास निर्णायक मत देणे,

७. सभागृहाच्या अधिकाराचे रक्षण करणे, गैरवर्तन करणाऱ्या सदस्याला समज देने किंवा सभागृहातून बाहेर जाण्यास सांगणे, .

८. अध्यक्षांच्या गैरहजेरीत ही सर्व कामे उपसभापतींना करावी लागतात.

## विधानपरिषदेची अधिकार व कामे

## १. कायदेविषयक अधिकार

कोणतेही सामान्य विधेयक विधानपरिषदेत मांडता येते. विधानसभेकडून पारित होऊन आलेल्या विधेयकामध्ये विधानपरिषद दुरुस्त्या सुचवू शकते. किंवा ते विधेयक फेटाळू शकते; पण पुन्हा तेच विधेयक विधानसभेने पाठविल्यास त्यास मान्यता द्यावी लागते.

## २. आर्थिक अधिकार

अर्थविधेयकाबाबत दुरुस्त्या सुचविण्याचा अधिकार विधानपरिषदेस असला तरीही त्या दुरुस्त्या मान्य करणे किंवा अमान्य करणे  हा अधिकार विधानसभेचा आहे.

विधानपरिषदेला विधानसभेपेक्षा फारच कमी अधिकार आहेत. विधानपरिषद निर्मिती व बरखास्ती विधानसभेवरच अवलंबून आहे.

## घटक राज्य विधिमंडळाची अधिकार व कामे

### १. कायदेविषयक अधिकार

संसदेप्रमाणेच कायदानिर्मिती हे विधिमंडळाचे महत्त्वाचे कार्य आहे. राज्य सूचीतील ६१ विषयांवर व सामायिक सूचीतील ५२ विषयांवर कायदे करण्याचा अधिकार विधिमंडळाल आहे. तसेच जुन्या कायद्यामध्ये दुरुस्ती करणे, नवीन कायदा करणे,कायदा रद्दबातल करणेचे अधिकार विधिमंडळाला आहेत. दोन्ही सभागृहांत मतभेद झाल्यास संयुक्त बैठकीची तरतूद मात्र नाही.

## २. कार्यकारी अधिकार

राज्याच्या कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवण्याचे काम विधिमंडळ करते. त्यासाठी मंत्र्याच्या कारभाराबाबत प्रश्न विचारणे, चर्चा करणे, तहकुबी सूचना, लक्षवेधी सूचना, स्थगन प्रस्ताव या मार्गाचा अवलंब केला जातो.

## ३. निवडणुकीबाबत अधिकार

राष्ट्रपतींच्या निवडणुकीत विधानसभेचे सदस्य मतदान करतात.

## ४. आर्थिक अधिकार

शासनाच्या सर्व आर्थिक व्यवहारांवर विधिमंडळाचे नियंत्रण असते. विधिमंडळाच्या संमतीशिवाय शासनाला पैसा खर्च करता येत नाही व उभारता येत नाही. सर्व खात्यांच्या व्यवहारांना विधिमंडळाची मान्यता आवश्यक असते. दरवर्षीच्या अंदाजपत्रकाला विधिमंडळाची मंजुरी घ्यावी लागते; पण आर्थिक व्यवहाराबाबत विधानपरिषदेपेक्षा विधानसभेला अधिक झुकते माप दिले आहे.

## ५. घटना दुरुस्तीचा अधिकार

काही महत्त्वाच्या घटना दुरुस्तीसाठी निम्म्यापेक्षा अधिक घटक राज्यांच्या विधानसभेची मान्यता आवश्यक असते.

## ६. इतर कार्ये

घटक राज्याचे नाव बदलणे, सीमांमध्ये बदल करणे यासाठी विधानसभेला ठराव मंजूर करून संसदेकडे पाठवावा लागतो. विविध आयोग, समित्या, चौकशी कमिट्यांच्या अहवालांची विधानसभेत चर्चा केली जाते.

## सारांश

आधुनिक काळात कायदे करण्यासाठी जनतेला जबाबदार असणारी कायदेमंडळ नावाची यंत्रणा उपयुक्त ठरत असल्याचे आपणास लक्षात येते. कायदे तयार करण्यासाठी कायदेमंडळाची नितांत आवश्यकता असते. भौगोलिकदृष्ट्या मोठ्या असणाऱ्या देशामध्ये केंद्रीय पातळीवर केंद्रीय कायदेमंडळ असून घटक राज्यांकरताही स्वतंत्र कायदेमंडळ असते. लोकसभा, राज्यसभा व राष्ट्रपती यांनी मिळून भारताचे केंद्रीय कायदेमंडळ बनते, तर राज्यपाल, विधानसभा व विधानपरिषद यांचे मिळून घटक राज्याचे विधिमंडळ बनते. केंद्र आणि घटक राज्यांच्या प्रत्येक सभागृहाचे सभापती असतात. त्यांच्याच देखरेखीखाली. सभागृहाचे कामकाज चालते लोकसभा, राज्यसभा, विधानसभा व विधानपरिषद या प्रत्येक सभागृहाचे अधिकार व कार्य असतात.